# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २८/०६/२०२२ (मंगळवार)

---

## नागपुर ग्रामीण हद्दीतील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत जप्त केलेल्या नारकोटीक्स ॲन्ड ड्रग्स कायद्याखाली गांजा (अंमली पदार्थ) नाश कारवाई

आज दिनांक २८/०६/२०२२ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील नारकोटीक्स ॲन्ड ड्रग्स कायदाखाली विविध ३३ गुन्हयातील विविध पोलीस स्टेशन मधील जप्त करण्यात आलेला एकुण २९९ किलोग्रॅम गांजा जिल्हा अंमली पदार्थ नाश समिती चे अध्यक्ष श्री. विजयकुमार मगर, पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर, सदस्य श्री. राहुल माकणीकर अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर, श्री. संजय पुरंदरे पोलीस उप अधीक्षक (गृह), नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर व श्री. ओमप्रकाश कोकाटे पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर यांचे उपस्थितीत मे. सुपर्ब हायजेनिक डिस्पोजल प्रा.लि.मौजा भांडेवाडी, ता.जि.नागपूर येथे दोन शासकीय पंचा समक्ष नाश करण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे कुही, कोंढाळी, खापा, रामटेक, खापरखेडा, एमआयडीसी बोरी, नरखेड, केळवद, कळमेश्वर, बोरी, उमरेड, काटोल, पारशिवनी, देवलापार, बेला, देवलापार, मौदा अशा पोलीस स्टेशन मधील मुद्येमाल नाश करण्यात आलेला आहे. सदरची नाश कार्यवाही वित्त मंत्रालय (राजस्व विभाग) वित्त मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. १६ जानेवारी २०१५ रोजी राजपत्र निर्गमित केलेले .राजपत्रात दिलेल्या निर्देशाप्रमाणे करण्यात आली आहे.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडलेला आहे.)**

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन पारशिवनी :–** अंतर्गत मौजा नयाकुंड ०६ कि.मी पुर्व. येथे दिनांक २७/०६/२२ चे २०/३० वा. दरम्यान, मृतक नामे– प्रल्हाद वामनरावजी खोडके वय ३९ रा.नयाकुंड हा रोडचे बाजुला झोपला असता कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन निष्काळजीपणे चालवुन मृतकास धडक दिल्याने, डोक्याला मार लागुन तो जख्मी होवुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे–गणेश राजेरामजी सोनटक्के वय ५३ रा.वार्ड क्र १ नयाकुंड ता. पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम २७९,३०४(अ) भा.द.वी सहकलम १८४ मो.वा का अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो उपनि पळनाटे मो क्र ७३८७०८६१७८ हे करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणे

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** अंतर्गत मौजा फेटरी ०९ कि.मी. पुर्व, येथे दिनांक २७/०६/२२ चे ०७/०० ते २२/०० वा. पर्यंत. यातील फिर्यादी यांची नाबालीक मुलगी वय १५ वर्षे ही आपले शाळेत जायेभाये ज्युनियर कॉलेज, सदर नागपूर येथे गेली असता, परत आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने अल्पवयीन मुलीस तीचे अज्ञानाचा फायदा घेवून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो स्टे कळमेश्वर येथे कलम ३६३ भादवि अन्वयें दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास– स.पो.नि. मनोज खडसे मो.नं. ९४२१०५०३७० हे करीत आहे.

## गळफास लावुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन सावनेर :–** अंतर्गत परसोडी वकील शिवार ०८ किमी दक्षिण येथे दिनांक २६/०६/२२ चे २०/०० वा. ते २७/०६/२०२२ चे ११ /१४ वा दरम्यान, यातील मृतक नामे– प्रविन घोंगडे वय ४५ वर्ष रा. प्लॉट न ५०/सी हावरापेठ नागपूर यांची मुलगी कु. अंजली प्रवीण घोगंडे वय १९ वर्ष हीने प्रेम प्रकरणात लग्न केल्याने कारणावरुन मृतक याने आपले मनावर परीणाम घेवून घटनास्थळी आपले स्वताचे शेतातील (कोठ्यात) लोखंडी ॲंगलला नायलॉन दोरीने गळफास लावून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विश्वनाथ बापुराव घोंगडे वय ७१ वर्ष रा. प्लॉट न ५०/सी हावरापेठ हनुमान गणपती मंदीर जवळ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अशोक निखाडे पोस्टे सावनेर मो.न ७७४१९४५१२७ हे करीत आहे.

## मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन खापरखेडा :–** अंतर्गत प्रिन्स बार खापरखेडा १ किमी पश्चिम. येथे दिनांक २४/६/२२ चे १५/३० वा दरम्यान, यातील फिर्यादी हा आपली बजाज सिटी ११० एक्स गाडी क्रं एम पी २८ एन ३८५३ खापरखेडा मेन रोड वरील प्रिन्स बार मध्ये उभी करून दारू पिण्यास गेला असता, कोणीतरी अज्ञात चोरांने फिर्यादीची **बजाज सिटी ११० एक्स गाडी क्रं एम पी २८ एन ३८५३ किमती ३०,०००/– रू** ची चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविन्द्र पंचलाल परतेती वय ३४ वर्ष रा. खुणारजिरकला पोस्ट इमलीखेडा तह.मोहखेड जि. छिदंवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ जाधव मो नं ९९२३१०४३१० हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**